॥ श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ॥

# ॥ श्रीपाद सेवा मंडळ ॥

विश्वस्त नोंदणी क्र. ए १९९३ पुणे / २५-१-१९९१

'श्रीगुरुकृपा', श्रीसंत मामासाहेब देशपांडे पथ,
आनंदनगर, हिंगणे खुर्द, पुणे - ४११ ०५१

**फोन :** (०२०) २४३५१८४० / २४३५३२७१
**फॅक्स :** (०२०) २४३५६७३८
**Email :** ssmandal@vsnl.com **Web :** www.ssmandal.com


॥ श्रीगुरुः शरणम् ॥

# ● वार्षिक कार्यक्रम पत्रिका ●

**२००८-२००९**

सकल सद्‌गुरुभक्त बंधुभगिनींना,
श्रीचरणस्मरणपूर्वक कृ.शि.सा.न.वि.वि.

आपणां सर्वांना नूतन वर्षाच्या अनेकानेक हार्दिक शुभेच्छा !

दरवर्षीप्रमाणेच, आजही प.पू.सद्‌गुरु श्री.मामांच्या अष्टदश पुण्यतिथी महोत्सवाच्या मंगल-पर्वावर, **'श्रीपाद सेवा मंडळा'**ची ही **'वार्षिक कार्यक्रम पत्रिका'** आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे.

आपणां सर्वांच्याच हार्दिक शुभकामना आणि प्रत्यक्ष अकृत्रिम आपुलकीने मिळणारे सहकार्य, यांमुळे मंडळाच्या नियोजित कार्याला निश्चितपणे मोठाच हातभार लागत आहे. नवीन वर्षातही आपणां सर्वांचे असेच प्रेमळ सहकार्य मंडळाला सतत आवर्जून लाभावे, अशी विनम्र प्रार्थना आहे !

या पुण्यमंगल-पर्वाच्या निमित्ताने, आपले सद्‌गुरुप्रदत्त नित्यसाधन; मानसजप, मानसपूजा, सामुदायिक साधना, नित्योपासना वगैरे न चुकता प्रेमाने



करीत जावे, ही सगळ्यांनाच कळकळीची प्रार्थना आहे ! आपणां सर्वांचे कुशल इच्छितो. कळावे ही विनंती.

**पुणे :**
'श्रीपाद नवमी',
फाल्गुन कृ.९, श्रीशके १९२९
दिनांक : ३० मार्च २००८

**आपले कृपाभिलाषी,**
विश्वस्त आणि संचालक,
श्रीपाद सेवा मंडळ, पुणे.

## ● वार्षिक कार्यक्रमांची रूपरेषा : २००८-२००९ ●

**एप्रिल २००८ :**

**(१) राजाधिराज सद्‌गुरु समर्थ श्रीअक्कलकोट स्वामी महाराजांचा प्रकटदिन महोत्सव :** चैत्र शु.२ श्रीशके १९३०; सोमवार, दिनांक ७ एप्रिल २००८ रोजी. श्रीक्षेत्र महाड येथील श्रीस्वामीसमर्थ श्रद्धास्थानात मुख्य उत्सव संपन्न होईल. मुंबई केंद्रातही सदर महोत्सव सोमवार, दिनांक ७ एप्रिल २००८ रोजी आयोजित करण्यात आलेला आहे.

**मे २००८ :**

**(२) राजाधिराज सद्‌गुरु समर्थ श्रीअक्कलकोट स्वामी महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव :** चैत्र कृ.१३ श्रीशके १९३०; शनिवार, दिनांक ३ मे २००८ रोजी; सोलापूर येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**(३) प.प.श्री.लोकनाथतीर्थ स्वामीमहाराज जयंती महोत्सव :** वैशाख शु. १२ श्रीशके १९३०; शुक्रवार दिनांक १६ मे २००८ रोजी, पुणे येथे संपन्न होईल.

**जुलै २००८ :**

**(४) प.प.श्री.वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या पुण्यतिथीचा आणि प.पू.सद्‌गुरु श्री.मामांच्या जयंतीचा महोत्सव :** आषाढ शु.१ आणि आषाढ शु.२ श्रीशके १९३०; गुरुवार, शुक्रवार; दिनांक ३ व ४ जुलै २००८ रोजी, कऱ्हाड येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**(५) देवशयनी, आषाढी एकादशी :** आषाढ शु.११ श्रीशके १९३०; सोमवार दिनांक १४ जुलै २००८ रोजी, पुण्यात 'माउली' येथे मुख्य कार्यक्रम.

**(६) श्रीगुरुपौर्णिमा महोत्सव :** आषाढ शु.१५ श्रीशके १९३०; शुक्रवार दिनांक १८ जुलै २००८ रोजी, पुणे व मुंबई येथे संपन्न होईल. पुण्याला पहाटे ६.३० ते ७.३० सामुदायिक साधना, ७.३० ते ८.३० अल्पोपाहार, चहापान; ८.०० ते १०.३० श्रीसद्गुरुपादुका पूजन, अभिषेक, श्रीसत्यदत्तपूजन, तीर्थप्रसाद; १०.३० ते ११.३० प.पू.श्री.शिरीषदादांचे प्रवचन, १२.३० वाजता प.पू.श्री.दादांचे मुंबई केंद्राच्या कार्यक्रमासाठी प्रस्थान.

**वांद्रे (पश्चिम) येथील कार्यक्रम :** यावर्षीचा कार्यक्रम, 'महात्मा गांधी सेवा मंदिर सभागृह', ग्लोबल ट-स्ट बँकेच्या वर, वांद्रे तलावासमोर, स्वामी विवेकानंद मार्ग, वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५० येथे; पहिल्या मजल्यावर आयोजित केलेला आहे. मुंबईतल्या दादर, डोंबिवली, ठाणे, कांदिवली वगैरे सर्व केंद्रांचा हा एकत्रित कार्यक्रम असेल, याची कृपया नोंद घ्यावी. दिनांक १८ जुलै २००८ रोजी, संध्याकाळी ४.३० ते ८.३० पर्यंत या कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. त्यात प.पू.श्री.शिरीषदादा यांचे प्रवचन नियोजित वेळी होईल. कार्यक्रमाला येणाऱ्या सर्व साधकांसाठी, महाप्रसादाची (भोजनाची) सुनियोजित व्यवस्था कार्यक्रम-स्थळीच केलेली आहे.

भारतातल्या इतर सर्व केंद्रांनी, आपापल्या केंद्रांच्या ठिकाणीच प्रस्तुत उत्सव संपन्न करावयाचा आहे.

**अमेरिकेतील कार्यक्रम :** अमेरिकेतील मुख्य उत्सव श्री.बापूसाहेब पुरेकर यांच्या घरी; सिल्व्हर स्प्रिंग, वॉशिंग्टन येथे संपन्न होईल. परदेशांतल्या इतर विविध केंद्रांनी, दरवर्षीप्रमाणेच प.पू.सौ.शकुंतलाताई आगटे यांच्या सूचनांनुसार एकत्र किंवा वेगवेगळ्या ठिकाणी उत्सवाचे आयोजन करावयाचे आहे. अमेरिकेतील कार्यक्रमांच्या सविस्तर माहितीसाठी, साधकांनी न्यूजर्सीच्या श्री.पद्माकरराव टोळे किंवा श्री.संदीप आगटे यांच्याशी संपर्क साधावा.

**ऑगस्ट २००८ :**

**(७) श्रावणमास अनुष्ठान, श्रीशके १९३० :** या वर्षीचेही प.पू.श्री.शिरीषदादांचे श्रावणमास अनुष्ठान (वैयक्तिक) श्रीक्षेत्र आंबेरी येथील प्रकल्पस्थानी संपन्न होईल.



दरवर्षीप्रमाणेच 'माउली' येथे, श्रावण शु.२ श्रीशके १९३०; रविवार, दिनांक ३ ऑगस्ट २००८ ते श्रावण कृ.१४ श्रीशके १९३०; शुक्रवार, दिनांक २९ ऑगस्ट २००८, या काळात संपन्न होणाऱ्या सामुदायिक श्रावण अनुष्ठान कार्यक्रमांची दैनंदिन रूपरेषा अशी असेल;

पहाटे ४.३० ते ५.३० सामुदायिक साधना, ६.०० ते ७.०० स्नानादी नित्यकर्मे, ७.०० ते ९.३० अनुष्ठान प्रथम सत्र, ९.३० ते १०.०० चहापान, विश्रांती; १०.०० ते १२.०० अनुष्ठान द्वितीय सत्र, १२.०० ते १२.३० नैवेद्य, आरती व नंतर महाप्रसाद. दुपारी ३.३० ते ५.०० श्रीज्ञानेश्वरी वाचन, ५.३० ते ६.३० सामुदायिक साधना, ७.०० ते ८.०० आरती; तदनंतर तीर्थ-प्रसाद, अल्पोपाहार व विश्रांती.

या अनुष्ठानकालातील महत्त्वाचे आणि उत्सवांचे दिवस असे आहेत;

(अ) **श्रावणी :** श्रावण शु. ५, बुधवार, दिनांक ६ ऑगस्ट २००८; सकाळी ८.०० ते दुपारी १२.३० पर्यंत.

(ब) **प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज जयंती :** श्रावण कृ.५, गुरुवार, दिनांक २१ ऑगस्ट २००८ रोजी.

(क) **भगवान श्रीकृष्णजन्माष्टमी महोत्सव :** श्रावण कृ. ८, शनिवार; दिनांक २३ ऑगस्ट २००८ रोजी, रात्री ७.३० ते १.३० पर्यंत. दुसऱ्या दिवशी; रविवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी; सकाळी १०.३० ते १२.३० श्रीहरिकीर्तन आणि गोपाळकाला.

श्रीक्षेत्र आंबेरी येथे, भगवान श्रीकृष्ण मंदिरामध्ये मुख्य उत्सव संपन्न होईल. महोत्सवाला येऊ इच्छिणाऱ्यांनी, पुणे अथवा आंबेरी प्रकल्प-कार्यालयाला, दिनांक १५ ऑगस्ट २००८ पर्यंत पूर्वसूचना देणे आवश्यक आहे.

(ड) **अनुष्ठान सांगता समारंभ :** श्रावण कृ.१४ श्रीशके १९३०; शुक्रवार, दिनांक २९ ऑगस्ट २००८ रोजी; दुपारी १२.०० वाजता.

**श्रावणमास अनुष्ठानासंबंधी विनम्र सूचना :**

१. पुण्यातील या अनुष्ठान-कार्यक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या बंधुभगिनींनी, दिनांक ६ ऑगस्ट २००७ पर्यंत, पुणे कार्यालयास त्याप्रमाणे

कळविणे आवश्यक आहे. परगावांहून येणाऱ्यांची निवास-भोजनादी व्यवस्था केलेली आहे.

२. अनुष्ठानकालात, दररोज दुपारी १२.३० ते २.३० या दरम्यान, 'अन्नपूर्णा'मध्ये महाप्रसादाची व्यवस्था केलेली आहे; तरी कृपया आपापल्या सवडीप्रमाणे, सर्व साधक-बंधुभगिनींनी सद्‌गुरु-प्रसादाचा लाभ घ्यावा; ही विनम्र प्रार्थना व सर्वांना सप्रेम निमंत्रण आहे.

३. श्रीसद्‌गुरूंच्या आदेशानुसार, सर्व साधक बंधुभगिनींनी, या अनुष्ठान-कालात 'माउलीत' अथवा आपापल्या घरी, 'श्रीगुरुचरित्र नित्यपाठ, श्रीसप्तशती गुरुचरित्रसार, श्रीदत्तलीलामृताब्धिसार, श्रीगुरुसाहस्री, श्रीदासबोध नित्यपाठ, श्रीस्वामीसमर्थ नामपाठ, श्रीदत्तमाहात्म्य आणि श्रीज्ञानेश्वरी' या गृंथांची शक्य होतील तेवढी पारायणे पूर्ण करून, त्याप्रमाणे पुणे कार्यालयाला आवर्जून कळवावे, ही नम्र विनंती.

४. संपूर्ण श्रावणमासात, प.पू.श्री.शिरीषदादांचा सर्व पत्रव्यवहार बंद राहील; याची नोंद घेऊन, कृपया या काळात पत्रव्यवहार करू नये ही विनंती.

**सप्टेंबर २००८ :**

**(८) भगवान श्री श्रीपाद श्रीवल्लभ स्वामीमहाराज यांचा जयंती महोत्सव :** दरवर्षीप्रमाणेच हा मुख्य महोत्सव, श्रीदत्तमंदिर प्रकल्प, श्रीक्षेत्र जळगांव (जामोद) येथे, भाद्रपद शु. ४ श्रीशके १९३०; बुधवार, दिनांक ३ सप्टेंबर २००८ रोजी संपन्न होईल.

उत्सव दिनांक २ व ३ सप्टेंबर २००८ असा दोन दिवस असेल. महोत्सवाला येणाऱ्यांची निवास-भोजनादी व्यवस्था केलेली आहे. येणाऱ्यांनी प्रकल्प-कार्यालयाला तशी पूर्वसूचना देणे गरजेचे आहे.

**ऑक्टोबर २००८ :**

**(९) श्रीगुरुद्वादशी महोत्सव, श्रीक्षेत्र नृसिंहवाडी :** आश्विन कृ. १२ श्रीशके १९३०; शनिवार, दिनांक २५ ऑक्टोबर २००८ रोजी. त्यानिमित्त पुण्याहून दरवर्षीप्रमाणे, दिनांक २४, २५ व २६ ऑक्टोबर २००८ दरम्यान छोटी भक्तियात्रा आयोजित केली जाईल.



**नोव्हेंबर २००८ :**

**(१०) सद्‌गुरु प.पू.मातु:श्री पार्वतीदेवी पुण्यतिथी महोत्सव :** कार्तिक शु. ८ श्रीशके १९३०; गुरुवार, दिनांक ६ नोव्हेंबर २००८ रोजी. त्यानिमित्त दिनांक ६ व ७ नोव्हेंबर २००८ रोजी, कोल्हापूर येथे शिबिर व मुख्य महोत्सव संपन्न होईल.

**(११) सद्‌गुरु श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी महोत्सव :** कार्तिक कृ. १३ श्रीशके १९३०; मंगळवार, दिनांक २५ नोव्हेंबर २००८ रोजी. त्यानिमित्त दिनांक २५ नोव्हेंबर २००८ रोजी, 'महात्मा गांधी सेवा मंदिर सभागृह', वांद्रे तलावासमोर, स्वामी विवेकानंद मार्ग, वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५० येथे, मुख्य उत्सव संपन्न होईल.

**डिसेंबर २००८ :**

**(१२) भगवान श्रीदत्तात्रेय जयंती महोत्सव; श्रीक्षेत्र दत्तधाम, हेळवाक :** मार्गशीर्ष शु. १५ श्रीशके १९३०, शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर २००८ रोजी. दुसऱ्या दिवशी (शनिवार, १३ डिसेंबर २००८ रोजी) पारणे व महाप्रसाद. महोत्सवाला येऊ इच्छिणाऱ्यांनी, आपल्या येण्याची पूर्वसूचना पुणे कार्यालयाला ४ डिसेंबर २००८ पर्यंत दिल्यासच केवळ त्यांची भोजन-निवास व्यवस्था करणे शक्य होईल; याची कृपया नोंद घ्यावी.

**(१३) प.पू.सद्‌गुरु योगिराज श्री.वा.द.गुळवणी महाराज जयंती महोत्सव :**

मार्गशीर्ष कृ.१३ श्रीशके १९३०; गुरुवार, दिनांक २५ डिसेंबर २००८ रोजी, पुणे येथे संपन्न होईल.

**(१४) भगवान श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराज जयंती महोत्सव :** पौष शु.२ श्रीशके १९३०; सोमवार, दिनांक २९ डिसेंबर २००८ रोजी, पुणे केंद्रात मुख्य उत्सव संपन्न होईल.

**जानेवारी २००९ :**

**(१५) प.पू.सद्‌गुरु योगिराज श्री.वा.द.गुळवणी महाराज पुण्यतिथी महोत्सव :** पौष कृ.८ श्रीशके १९३०; रविवार, दिनांक १८ जानेवारी २००९ रोजी. त्यानिमित्त भिलाई (छत्तीसगड) केंद्रात, दिनांक १७ व १८ जानेवारी २००९ रोजी शिबिर व मुख्य महोत्सव संपन्न होईल.

**फेब्रुवारी २००९ :**

**(१६) भगवान श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराज श्रीशैल्यगमन महोत्सव :** माघ कृ.१ श्रीशके १९३०; श्रीगुरुप्रतिपदा; मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी २००९ रोजी, चिपळूण केंद्रात मुख्य उत्सव संपन्न होईल. त्यानिमित्ताने कोकण विभागातील सर्व केंद्रांचे एकत्रित शिबिर, दिनांक ९ व १० फेब्रुवारी २००९ रोजी, चिपळूण येथे आयोजित करण्यात आलेले आहे.

**(१७) प.प.श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज पुण्यतिथी महोत्सव :** माघ.कृ.३ श्रीशके १९२९; गुरुवार, दिनांक १२ फेब्रुवारी २००९ रोजी. पुणे येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**मार्च २००९ :**

**(१८) सद्गुरु योगिराज प.पू.श्री.मामांचा एकोणिसावा पुण्यतिथी महोत्सव :** फाल्गुन कृ.९, 'श्रीपाद नवमी' श्रीशके १९३०; शुक्रवार, दिनांक २० मार्च २००९ रोजी. त्यानिमित्त, पुणे येथे दिनांक १९ व २० मार्च २००९ रोजी, शिबिर व मुख्य महोत्सव संपन्न होईल.

□□

---

**विशेष सूचना :**

१. 'श्रीपाद सेवा मंडळा'च्या कोणत्याही कार्यक्रमातील **'सामुदायिक साधने'**ला येऊ इच्छिणाऱ्या साधकांनी, आपले **'आय-कार्ड'** आणि **'साधनेचे आसन'** न चुकता सोबत आणणे गरजेचे आहे. साधकांव्यतिरिक्त, उर्वरित कार्यक्रमांत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या इतर सज्जनांकरिता मात्र हा नियम नाही.

२. बाहेरगांवांहून येणाऱ्या साधक मंडळींनी त्या त्या केंद्राला, प्रकल्प-कार्यालयांना, किंवा पुणे मुख्य-कार्यालयाला लेखी अथवा फोनवर पूर्वसूचना दिल्यासच, त्यांची कार्यक्रमस्थळी निवासाची व्यवस्था करता येणे शक्य होईल; याची कृपया नोंद घ्यावी.



३. या 'कार्यक्रम-पत्रिके'तील नियमित उत्सवांव्यतिरिक्त, दरवर्षीप्रमाणेच शिबिरांचे कार्यक्रम अकोला, नागपूर, अकलूज, नाशिक, पणजी वगैरे केंद्रांच्या ठिकाणी, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २००८ मध्ये संपन्न होणार आहेत. पुणे कार्यालयाशी पत्राद्वारे वेळोवेळी संपर्क ठेवल्यास, या सर्व कार्यक्रमांची सविस्तर माहिती साधकांना त्या त्या वेळी मिळू शकेल.

४. प.पू.सौ.शकुंतलाताई, प.पू.श्री.शिरीषदादा, श्रीवामनराज प्रकाशन आणि श्रीपाद सेवा मंडळ; यांच्या वा इतर कोणत्याही संदर्भात, आपण पत्रव्यवहार केल्यास, सोबत उत्तरासाठी न विसरता पोस्टेज (आवश्यकतेप्रमाणे तिकीट, पाकीट, अंतर्देशीय किंवा कार्ड) आपला पत्ता त्यावर सुवाच्य अक्षरात घालूनच पाठवावे.

कृपया पत्राला, पाकिटाला स्टेपल करू नये. तसेच आतील कागद बाहेरच्या पाकिटाला चिकटणार नाहीत, याचीही काळजी घ्यावी ही विनंती.

**५. उत्तरासाठी पुरेसे पोस्टेज समवेत नसलेल्या कोठल्याही पत्राला उत्तर पाठविले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

६. माउलीतून प.पू.सद्गुरु श्री.मामांच्या प्रसादाची विभूती (अंगारा) हवी असल्यास, आपल्या पत्रासोबत कृपया पुरेसे पोस्टेज किंवा टपालपाकीट (स्वतःच्या पत्त्याचे) पाठवावे. नसल्यास विभूती पाठविणे शक्य होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

७. प्रत्येक एकादशीला सकाळी ८ ते १२ या वेळात, 'माउली'मध्ये **'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ।'** या महामंत्राचा सामुदायिक नामजप होईल. सर्व साधकांनी याचा अवश्य लाभ घ्यावा.

**वरीलप्रमाणे, परंपरेचे सर्व महोत्सव, पुणे येथील मुख्य केंद्रामध्ये ('माउली'मध्ये) सुद्धा, त्या त्या दिवशी सायंकाळी ४.३० ते ७.३० या वेळात संपन्न होतील; याची कृपया सर्व साधकांनी नोंद असू द्यावी.**

□□